# प्रभु तरुण

| वर्ष ५६ | अंक ०६ | मुंबई | १६ फेब्रुवारी, २०२३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## 'भोपळ्यातली म्हातारी...'

—सुहासिनी कीर्तिकर

सध्या मी या नाहीतर त्या लेकीकडे मुक्कामाला असते. जुनी गोष्ट आठवतेय... म्हातारी भोपळ्यात बसून 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक' लेकीकडे जात असते. मध्ये भेटणाऱ्या प्राण्यांना हुलकावणी देत ती म्हणते, 'लेकीकडे जाईन. चांगलं चुंगलं खाईन. लठ्ठमुठ्ठम् होईन. मग तू मला खा.' आता मी त्या म्हातारीसारखी लठ्ठमुठ्ठम् झाल्येय. मात्र गोष्टीतला भोपळा कुठून येणार? मी आपली भोपळ्यात नाही; तर टी.व्ही. नावाच्या भोपळ्यासमोर बसून इथलातिथला, आजचा कालचा प्रवास करत असते बापडी. तर मंडळी; सांगायची गोष्ट अशी की मी अशीच टी.व्ही.वर जुने चित्रपट पहात होते. नावाजलेले, कलात्मक असे ते चित्रपट. त्यातला एक होता - 'आक्रोश'. ओम पुरी, नसरुद्दीन यांचा. श्रेय नामावली सुरू झाली. अन् काय! त्यात विहंग नायक, प्रदीप कोठारे, अरविंद धुरंधर ही ओळखीची नावे!! गंमतीचा योगायोग म्हणजे विहंग त्या चित्रपटात संपादकाच्या भूमिकेत आहेत. पुढे भविष्यात ते 'प्रभुतरुणा'चे संपादक होतील हे त्यावेळी त्यांच्या वा इतर कुणाच्या गावीही नसेल. पण सुहास कोठारे अचानक गेले अन मित्रकर्तव्य म्हणून विहंग संपादक झाले. ते संपादक झाले अन् त्यांनी 'प्रभुतरुण' वेगळ्या प्रगत वाटेने घडवला. मी कार्यकारी संपादक. या नात्याने विहंग आणि माझ्यात संवाद सुरू झाला. प्रभुतरुणाला वेगळा आकार देण्यासाठी काय करता येईल याच्या गप्पा व्हायच्या. दर महिन्याच्या एक तारखेपासून दहा तारखेपर्यंत अगदी रोऽऽज. तरुणांना सामावून घेण्यासाठी त्यांनी इंग्रजी लेखन छापणे सुरू केले. वर्षभरातल्या बारा संपादकीयातील एक लेख ते जाणीवपूर्वक इंग्रजीत लिहीत. 'अतिथी संपादक' ही संकल्पना प्रत्यक्षात आणून चोवीस तरुण संपादकांना त्यांनी संपादकांच्या खुर्चीत बसवले. मुकुंद अजिंक्य, प्राचार्य विजयकरांसारखे बुजुर्ग लेखक त्यांनी जपले. दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर अदिती जयकर हिच्या चित्रांना जागा देऊन काही परभू संकल्पनांना ठळकपणे त्यातून अधोरेखित केले. त्यांच्या संपादकीय काळात जो प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीचे दहा दिवस संवाद व्हायचा तो ते अगदी इटलीच्या प्रवासात वा इंग्लंडच्या मुक्कामातही कधीच तुटला नाही. त्यांना कार्यकारी संपादकाचे (म्हणजे माझे) कौतुक होते आणि 'प्रभुतरुण' चालवायचा तर ही दोन चाके समांतर धावायला हवी याचे भान होते. जबाबदारीची जाणीव होती. ती इतकी परिपूर्ण होती की या संपादकीय काळात त्यांचे हृदयाचे ऑपरेशन झाले. ते इस्पितळात असताना मी काय, काय करायचे, याच्या त्यांनी सूचना दिल्या. इतकेच नव्हे तर; ऑपरेशन थिएटरमध्ये त्यांना नेले जात असतांनाही त्यांनी मला आठवणीने फोन केला. एका व्यवसायात मॅनेजर असलेल्या या संपादकाची ही मॅनेजमेंट! हे कर्तव्याचे भान!!

'मॅनेजर' या शब्दावरून त्यांच्या इतरही आठवणी 'भोपळ्या'त बसल्या. अनेक पुस्तकांवर, नाटकांवर ते माझ्याशी बोलत. त्यांची सेक्रेटरी फोन जोडून देई; तेव्हा तीही अनेकवेळा गप्पात भाग घेई. 'पुरुष' नाटकातली त्यांची भूमिका, विजय तेंडुलकरांना त्यांनी लिहिलेले पत्र, तेंडुलकर गेल्यावर 'तें' या पुस्तकात असलेला त्यांचा लेख.... साहित्य संमेलनातील निवडणुका, 'अवघाचि संसार' मालिकेत त्यांनी सादर केलेली कुसुमाग्रजांची कविता, सुहिता थत्तेबरोबरच्या अभिनयामुळे त्यांची घेतली गेलेली 'नवल' फिरकी; ....किती तरी आठवणी. ते लंडनला गेले तेव्हा त्यांनी मागितल्याने मी त्यांना प्रकाश संतांचे पुस्तक दिले होते वाचायला. त्यावर गप्पा! मी मुंबई मराठी साहित्य संघाच्या साहित्य शाखेची तेव्हा कार्यवाह होते. केळकर कॉलेजच्या सहकार्याने महाविद्यालयीन साहित्य संमेलन घेतले. त्याला प्रमुख पाहुणा म्हणून विहंगने भरत दाभोळकर मिळवून दिले. इतकेच नव्हे; तर ते स्वतःही त्यांच्याबरोबर आले. दादर सार्वजनिक वाचनालयात एका कार्यक्रमात वक्ता म्हणून केवळ माझ्या आग्रहामुळे त्यांचा सहभाग होता. वृद्धाश्रमावर आधारित गोवा हिंदू असोसिएशनचे एक नाटक होते. 'सुखधाम' की काहीतरी नावाचे. (चूकभूल द्यावी, घ्यावी.) त्यात बाळ कर्वे, सुबोध भावे, विहंग आदी मंडळी होती. नाटक बघायला त्यांनी मला आमंत्रित केले. मी, उज्ज्वला मेंहेंदळे, मीना प्रभू... अशा गेलो. मग दुसऱ्या दिवशी त्यांचा फोन! नाटकाविषयी चर्चा करायला. ही चर्चा होत असतानाच एक फलद्रूप अशी घटना घडली. मी त्यावेळी कोकण मराठी साहित्य परिषदेच्या दक्षिण विभागाची अध्यक्ष होते. मग असे ठरले की हे नाटक जांभूळपाड्याच्या वृद्धाश्रमात करायचे. जाण्यायेण्याचा खर्च, भोजन आदी कोमसापचा. कलाकार निःशुल्क (मानधन न घेता) काम करतील. जोडीने रजनी जोशी आणि अरविंद पिळगावकर यांच्या गाण्याचा कार्यक्रम ठरला. या सगळ्यात पुढाकार विहंग यांचाच. आपण समाजाचे देणे लागतो; याचे त्यांना भान होते; माणसं जपण्याची कला होती. म्हणूनच पाठारे प्रभु चॅरिटीजच्या कार्याविषयी त्यांना आस्था होती. याच चॅरिटीजची वार्षिक सभा होती अन् मी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या सभेकरिता त्यावेळी रत्नागिरीला होते. विहंगना चित्रपटाचे शूटींग होते. त्यांचा मला फोन आला. मग त्यांनी ठरवले की प्रभुतरुणाच्या संपादकांपैकी कुणीतरी सभेला असलेच पाहिजे. म्हणून दुसऱ्या दिवशी पहाटे चित्रीकरणाच्या ठिकाणी जाण्यासाठी निघावे; असे ठरवून ते सभेला हजर राहिले. सभा संपल्यावर मला फोन करून त्यांच्या पद्धतीने सभेचा वृत्तान्त सांगीतला. थेट मधुकर तळपदेंच्या घरी गप्पा मारायला गेले. व्यस्त असणाऱ्या विहंग यांचे दुसऱ्या दिवशी अस्ताव्यस्त रूप दिसेल हे कुणाला ठावकी!

त्या दुर्दैवी घटनेने सर्वांचेच 'बॉटम्स अप' झाले. तरीही 'प्रभुतरुण' त्यांनी दिलेल्या उर्जेसकट चालत राहिला आहे. 'आम्ही चालवू हा पुढे वारसा' म्हणत. त्याबद्दल पुन्हा केव्हातरी. त्यांनी फक्त 'लढ' म्हटले आणि आम्ही पुढे जात राहिलो... मंडळी; भोपळ्यातली म्हातारी आठवणीत रमली अन् प्रभुतरुणाचा सुंदर गतकाळ पुढे आला, विहंगच्या आठवणींचे बोट धरून. तुम्हीही आमचे बोट धरले आहेच. ते कधीही सुटणार नाही. कधीही नाही!!

'हर्ष'

# वास्तू

-हेमंत विनायकराव तळपदे

प्रत्येक माणसाचे एक छोटेसे स्वप्न असते. ते म्हणजे आपलं छोटेसे का होईना पण घर असावं. तसे पाहता काही व्यक्ती नशीबवान असतात. त्यांना हे घर विकत घ्यावं लागत नाही कारण त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या परिश्रमांची ती मीमांसा असते. काहींना प्रशस्त घर लाभते तर काहींना बंगलाही लाभतो. तर काहींना एकच नव्हे तर दोन अथवा तीन घरेही लाभतात.

पण बरेचजण या पूर्वपिढीच्या वारसाला मुकतात. बऱ्याचदा त्यांचे निम्याहून जास्त आयुष्य स्वत:चे घर घेण्यास व त्यावरील कर्जाचे हप्ते फेडण्यास व्यतीत होते. काहींच्या भाग्यात तर स्वत:चे घर घेणेही नशीबात नसते. मग हे इसम आपल्या कुटुंबासह कोणातरी नातेवाईकांच्या अथवा भाड्याच्या घरात आपले जीवन व्यतीत करतात. पण काहीही असो आपले स्वत:चे घर असावे ही भावना जवळजवळ सर्वांच्याच मनात बिंबलेली असते. 'असावे घर ते आपुले छान' हे गाणे आजही आपल्या ओठावर पुटपुटले जाते. असो.

पण बऱ्याचदा आपली वास्तू असली तरी तिचा विचार कसा करावा वा तिचा चांगला उपभोग कसा घ्यावा याबाबत बऱ्याच अंशी अनेकांची गल्लत होते. आजकाल विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरात केवळ तीन ते पाच माणसे राहतात. पण घराला घरपण कसे येईल या महत्त्वाच्या विषयाकडे बरेचजण कानाडोळा करतात.

जरा विचार करा, 'हे माझे घर आहे' हा विचारच आपल्याला किती सुखद अनुभूती देतो. पण ही वास्तू पवित्र ठेवण्यासाठी मी स्वत: काय करावे हा विचार करण्यासाठी आपल्याजवळ फारसा वेळ नसतो. तसे सर्वजण करतात असेही नाही. चिमण्या, कावळेही आपापली घरटी स्वत: बांधतात. मग ती झाडांच्या फांद्यांच्या खोबणीत असली तरी चांगली मजबूत असतात. कितीही वादळे आली आणि त्या बेफाम वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे फांद्या कितीही डोलल्या तरी त्यांची बाळे या घरट्यात निवांत झोपलेली असतात. तसेच माणसांचे आहे. आपले कुटुंब आपल्या घरट्यात सुखाने रहावे, सुरक्षित रहावे हे कोणाला वाटत नाही? आणि याच छोट्याशा का होईना घरट्यासाठी मानव अहोरात्र मेहनत करण्यास तयार असतो. मग तो हे घर आपल्या मनाप्रमाणे सजवतो. कधी घरात हॉलमध्ये चांगल्या टाईल्स लाव, खिडक्या व दरवाजांवर महागडे पडदे सोड, बाथरुममध्ये महागडे शॉवर, गिझर इतकेच नव्हे तर जमले तर बाथटब लाव. स्वयंपाकघर निरनिराळ्या साधनांनी परिपूर्ण कर. मग तो मिक्सर, ग्राइंडर, मायक्रोवेव, पिठाची चक्की अथवा गॅस, इंडक्शन स्टोव्ह वगैरे वगैरे. आपल्या घराला परिपूर्ण करण्यासाठी आपली धडपड अविरतपणे चालूच असते. पण हे करता करता आपण एक महत्त्वाची गोष्ट कळत नकळत विसरतो. ती म्हणजे आपली वास्तू. लक्षात ठेवा ही वास्तू अचल असली तरी तिला एक जीव आहे. तिच्याकडे आपण जर दुर्लक्ष केले तर ही वास्तू नाराज होते व आपल्या जीवनात अनेक क्लेश निर्माण करते. पण जर आपण ही वास्तू स्वच्छ ठेवली, जळमट विरहीत ठेवली, आपल्या उंबरठ्याचे नियमितपणे पूजन केले. संध्याकाळी दिवे लागणीच्या वेळी या वास्तूस धूप जाळून अथवा उदबत्ती लावून तिच्या सुगंधाने ताजेतवाने केले तर हीच वास्तू आपल्याला मनापासून आशीर्वाद देते. दक्षिणेकडून मुंबईत रहावयास आलेल्या अनेक कुटुंबांमध्ये आजही संध्याकाळी उंबरठ्याला लाल मातीने सारवून त्यावर सुंदर रांगोळी काढली जाते व छोट्याश्या निरांजनाने तो उंबरठा आजही पूजला जातो हे मी स्वत: पाहिले आहे.

आता तुम्ही म्हणाल ही सर्व अंधश्रद्धा आहे. पण नीट विचार करा. मुलांनी संस्कारक्षम बनावे म्हणून आईवडील अखंड जागरूक असतात. त्यांच्या पालनपोषणाकडे बारीक लक्ष ठेवून असतात. त्यांना मोठे करताना या आईवडिलांचे तारुण्य संपून वृद्धापकाळ केव्हा सुरू होतो हे त्यांना उमजतही नाही. तसेच जी वास्तू तुमच्या कुटुंबाला प्रेमाने बांधून ठेवते ती वास्तू प्रसन्न रहावी हे आपल्या का संयुक्तिक वाटत नाही. पण या महत्त्वाच्या बाबीकडे आपण सहजपणे दुर्लक्ष करतो.

माझ्या मते तुम्हीही एक प्रयोग करा. जमेल तितके आपल्या वास्तूला स्वच्छ ठेवा. संध्याकाळी दिवाबत्ती करा, धूप फिरवा. घरातील देव्हाऱ्यात नियमितपणे पूजा करा. उंबरठ्याचेही पूजन करा. भले ही अंधश्रद्धा समजा आणि मग चमत्कार पाहा. तुमच्या आयुष्यात काही सकारात्मक बदल आपोआपच जाणवतील. कदाचित लगेचच नाही. कारण वास्तू कोणत्या ना कोणत्या रूपाने आपले भले करतेच पण ते उमजायलाही वेळ लागतो. जी वास्तू आपल्याला अनेक वर्षे साथ देते ती आपल्या कुटुंबाचा एक घटक आहे हे आपणास निश्चितच उमजले पाहिजे.

पण काही माणसे या वास्तूला अकारण त्रास देतात. त्या वास्तूत ही कुटुंबे सकाळपासूनच आदळआपट करतात, एकमेकांना अर्वाच्य शिवीगाळ करतात. बऱ्याचदा दारू पिऊन धिंगाणा घालतात. घरातील लहान मुले घराच्या मुख्य दरवाजावर लाथा भारतात. काही वेळा तर घराचा कचराही रोज नियमितपणे निघत नाही आणि फरश्याही पुसल्या जात नाहीत. कपड्यांचे बोळके पलंगावर, खुर्च्यांवर अस्त्याव्यस्त पडलेले असतात. काही घरात तर देवघराचा पत्ताही नसतो. मग ही कुटुंबे आम्ही देव मानत नाही असे स्पष्टपणे सांगतात. पण या सर्व पापकर्मापुढे ही वास्तू दुखावली जाते व त्याचे दुष्परिणाम या कुटुंबाला भोगावेच लागतात.

आणखी एक गोष्ट कदाचित आपणा सर्वांना जाणवली असेल की केव्हाकेव्हा आपल्या दिवाणखान्यात अथवा स्वयंपाकघराला आपल्याला काही अस्पष्ट हालचाल झाली असे जाणवते. आपण दचकतोही; पण घाबरू नका हा वास्तुपुरुष बऱ्याचदा संचार करत असतो. तो आपल्या कुटुंबाच्या रक्षणासाठी सदैव जागरूक असतो. आपल्या कुटुंबावर एखादे संकट येणार असेल तर कोणत्या ना कोणत्या रुपात हा वास्तुपुरुष आपल्याला सचेतही करतो. पण कधीकधी त्याचा हा इशारा आपल्याला उपजतही नाही.

तर मंडळी मी आज एवढेच सांगेन की आपल्या वास्तूला सचेतन भावून आपण जर तिचा आब राखला, तिचे नियमितपणे पूजन केले, आपले घर स्वच्छ ठेवले इतकेच काय घरातील प्रत्येक सदस्याने बाहेर जाताना मनातल्या मनात वास्तुपुरुषाला प्रणाम केला तर हा वास्तुपुरुष प्रसन्न होऊन आपल्याला निश्चितच सुखमय जीवन जगण्यास आशीर्वाद देईल. याची अनुभूती कदाचित आपणास पटकन येणार नाही पण काही काळानंतर आपल्याला याचे महत्त्व पटेल असे मला वाटते. जमल्यास आपण स्वत: ही गोष्ट जरूर अनुभवा. इतकेच.

९८२१६०७५९३

*

# कृपया अहेर आणू नये....

- दीपक माधव धैर्यवान

आपल्याला येणाऱ्या बहुतांशी निमंत्रणपत्रिका मग त्या लग्नाच्या असो, वाढदिवसाच्या असो. कुणाच्या विवाहाच्या रौप्यमहोत्सव, सुवर्ण महोत्सव वा हिरक महोत्सवाच्या असो किंवा इतरही काही समारंभाच्या असो त्या निमंत्रण पत्रिकेच्या शेवटी एक टीप आवर्जून लिहिलेली असते व ती म्हणजे 'कृपया अहेर आणू नये' "No Present, Sweets or Flowers Please", "Blessings only."

पण आपण त्याचं पालन करतो का? तर बहुतांशी नाही असेच असते अर्थात काही सन्माननीय अपवाद असतात की ते मात्र ह्या विनंतीला योग्य तो मान देतात. नाही असे नाही.

वास्तविक सध्याच्या आर्थिक सुबत्तेच्या आणि एकंदरीतच बदललेल्या जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर अशी ही विनंती खरोखरच योग्य अशीच आहे.

हल्ली बहुतांश लोकांकडे आपल्या नेहमीच्या वापरातल्या वस्तू म्हणजे फ्रीझ, टी.व्ही., वॉशिंग मशीन, मायक्रोवेव्ह, ओव्हन, टोस्टर, ग्रिलर, इस्त्री, इडली पात्र, डोसे, घावने, तऱ्हेतऱ्हेच्या पोळ्या करण्याचे वेगवेगळे तवे आदी अनेक वस्तू असतात. मग अशा वेळी अशी किंवा कपडे, साड्या ड्रेसीस त्यांना बळजबरीने देऊन आपण काम साधतो. उलट एखादी तत्सम वस्तू देऊन आपण त्यांची एकप्रकारे कुचंबणाच करतो. कारण त्यांच्याकडे असलेली वापरातली चांगली वस्तू विनाकारण बाजूला ठेवून तशीच आपण दिलेली वस्तू त्यांना त्यांच्या मनाविरुद्ध वापरायला भाग पाडतो.

तसेच मिठाई, चॉकलेटस्, किंवा इतरही गोड पदार्थांबद्दलही बोलता येईल. हल्ली बऱ्याच व्यक्तींना मधुमेह, रक्तदाब किंवा इतरही व्याधी असतात. मग अशा व्यक्तींना आपण हे देऊन काय उपयोग. एकतर ते स्वत: त्याचा आस्वाद घेऊ शकत नाहीत. मग आलेले असे छान पदार्थ जे त्यांच्या आप्तेष्ट, मित्र परिवार वा परिचितांनी मुबलक प्रमाणात दिलेले असतात ते इतरांना वाटत बसण्याचे काम नाईलाजाने करण्यास भाग पाडतो. ह्यातून शेवटी काय साध्य होते?

तसेच पुष्पगुच्छांच्या बाबतीतही म्हणता येईल.

म्हणूनच मंडळी मला प्रामाणिकपणे वाटते की आपण आपली मानसिकता बदलायला हवी. कुणाला काही द्यावसं वाटणं हे स्वाभाविक जरी असलं तरी आता ही देवाणघेवाणाची पद्धत एकप्रकारे कालबाह्यच झालेली आहे आणि ही वस्तुस्थिती आपल्या पचनी पाडून घेणे ही बदलत्या काळाची व जीवन शैलीची गरज आहे. पाहूया कितपत जमते ते!

आठवणीच्या साठवणीतून

# बागुलबोवा

-डॉ. सुमन नवलकर

(२)

एका वर्षी वार्षिक परीक्षा जवळ येऊन ठेपली, तरी माझा अभ्यास पूर्ण झाला नव्हता. सहावी- सातवीत असेन तेव्हा. सारखी मनातून भीती वाटत होती, की यंदा काही खरं नाही आपलं. विशेषतः गणिताचं. गणिताचा अभ्यास दादा घ्यायचे आणि दादांचं अख्खं ऑफिसच पुण्याला हलवल्यापासून गणित मागेच पडायला लागलं होतं. शाळेत गणिताच्या तासाला बाई शिकवत असत, तेव्हा सगळं कळल्यासारखं वाटायचं. पण घरी येऊन गणितं सोडवायला लागलं की काहीही जमत नसे. मग गणिताच्या धसक्याने इतर विषयांचा अभ्यासही होत नसे. सारखी मनात धास्तीच असायची, की अजून गणिताचा अभ्यास व्हायचाय. मग इतर विषयांची उजळणीही धडपणे व्हायची नाही. म्हणता-म्हणता परीक्षा दोन-तीन दिवसांवर येऊन ठेपली आणि मन अगदी बेचैन झालं.

गणिताचा पेपर मधेच गुरुवारी होता. आदल्या दिवशी रविवारही नव्हता. शनिवारी दादा पुण्याहून यायचे आणि रविवारी संध्याकाळी पुण्याला जायसाठी निघायचे. दोन दिवसांत त्यांनी गणित घास-घास घासून घेतलं असतं, तर काहीतरी आशा होती. पण यावेळी तीही आशा नव्हती. दादा प्रत्येक प्रकारची एक-दोन एक-दोन गणितं सोडवून घ्यायचे. गणितांची उत्तरं छान लक्षात असायची. मग त्यापैकीच गणित नेमकं परीक्षेत आलं, तर उत्तर आधीच शेवटच्या ओळीवर लिहून टाकायचं आणि मग तेच उत्तर येईपर्यंत गणित सोडवत राहायचं. दादांनी घोकून घेतलेली गणितं पेपरात आली की दादा म्हणायचे, ''आंधळ्याचा हात कसा नेमका बुडकुल्यात पड़तो, तसं आहे तुझं.'' पण या वेळी आदल्या दिवसाची घासून उजळणी घ्यायलाही दादा यायचे नव्हते.

पण कधी-कधी नशिबाची साथ अशी असते की चकित व्हावं. सोमवारी इंग्रजीचा पेपर होता. मंगळवारी, बुधवारी, विज्ञान, इ.भू.ना.शा.चे पेपर होते. पण गुरुवारच्या गणिताच्या पेपराचा बागुलबोवा सतत मानगुटीवर बसून भेडसावत होताच. मग काय अचानक जादू झाली की आदल्या गुरुवारी संध्याकाळी सडकून तापच आला. सर्दी नाही, खोकला नाही, घसादुखी नाही तरी ताप सडकूनच. डॉक्टरना घरीच बोलावलं. त्यांनी ताप उतरायचं औषध दिलं ,तरीही शुक्रवारी अख्खा दिवस ताप होता. तापाचा जोर जरा कमी झाला होता, पण पूर्ण उतरला नव्हता. शनिवारी सकाळी मात्र उठले तेव्हा ताप अजिबात नव्हता. सोमवारच्या इंग्रजीच्या पेपराचा अभ्यास करायला शनिवार-रविवार दोन पूर्ण दिवस मिळणार होते. पण मुख्य भीती होती ती गुरुवारच्या गणिताच्या पेपराची. त्यातून जरा कुठे गणिताचं पुस्तक चाळलं असतं,( ज्याने काय होणार होतं?) तर तीन दिवस तापामुळे झोपण्यातच गेले होते.

शनिवारी सकाळी डॉक्टर पुन्हा आले. ताप नाही पाहून खूश होऊन म्हणाले, ''चला, बरं झालं. आता काही पुन्हा चढायचा नाही तो. तरी पण उगीच खेळायला वगैरे पाठवू नका.''

''खेळायला कसली पाठवतेय! सोमवारपासून परीक्षा आहे वार्षिक.'' आईचं बोलणं ऐकून माझ्या तर पोटात गोळाच आला. वाटलं की, डॉक्टर नक्की म्हणणार, ''सोमवारपासून ना? मग आहेत की अजून दोन दिवस!'' काळजी सोमवारची नव्हती. मंगळवार-बुधवारही फारसे काळजी करण्यासारखे नव्हते. मुख्य काळजी होती ती गुरुवारचीच. पण डॉक्टर असं काहीही न म्हणता चक्क म्हणाले, ''अशक्तपणा खूप आहे. कशाला बसवताय परीक्षेला? नाही दिली परीक्षा, तर वर्ष फुकट जाईल का?''

''छे! छे! वर्षभरातल्या तीनही परीक्षांमधे चांगले मार्कस् मिळालेत. तो निकाल पाहून चढवतीलच.''

''मग नका बसवू परीक्षेला. मी मेडिकल सर्टिफिकेट देतो.''

चक्क उठून नाचावंसं वाटलं. पण चूपचाप पडून राहिले. न जाणो, डॉक्टरांनी त्यांचा बेत बदलून, 'ठणठणीत आहे चांगली. द्या पाठवून परीक्षेला,' म्हटलं तर? सोमवारी मी खरंच ठणठणीत होते. इंग्रजीचा अभ्यासही छान झाला होता. पेपराला जावंसं वाटत होतं. पण गणिताच्या भीतीने गप्प पडून राहिले ती थेट गुरुवारी सकाळची गणिताच्या पेपराची वेळ टळून जाईपर्यंत. शाळेने वरच्या वर्गात चढवलं. तापामुळे झाकली मूठ सव्वालाखाची राहिली. पण गणित जे कच्चं राहिलं ते राहिलंच.

अशीच गोष्ट घडली आमचा बाळोबा तिसरीत असताना. परीक्षेच्यावेळी तापाने आजारी झाला. अभ्यास तर सर्व झालेला होता. औषध घेऊन ताप उतरायचा. पण दुसऱ्या दिवशी सकाळी परीक्षेला जाऊन आला की संध्याकाळी ताप पुन्हा चढायचा. पठ्ठ्याने तापातच सगळेच्या सगळे पेपर दिले. आधी वर्ग-शिक्षिका म्हणाल्या होत्या, 'परीक्षा नाही दिली तरी वर्षभराचे गुण पाहून चौथीतही अ तुकडी मिळेल.' पण निकाल लागला तेव्हा निकाल पाहूनच अ तुकडी मिळाली. वर आणि तेव्हा म्हणाल्याही, 'बरं झालं, परीक्षेला पाठवलंत. नाहीतर अ तुकडी मिळाली नसती.' खरं काय ते त्यानाच ठाऊक.

आता कधी विचार केला तर वाटतं, 'ताप जाऊनही, अभ्यास झाला नव्हता म्हणून परीक्षा हुकल्याचा आनंद मानणारी मी कुठे आणि रोज संध्याकाळी ताप भरला, तरी दुसऱ्या दिवशी सकाळी ताप उतरल्यावर जाऊन पेपर देणारा माझा बाळोबा कुठे.' शिवाय गुणही छान मिळवले होते पठ्ठ्याने. अ तुकडी मिळवण्याइतके!

सगळे विषय मीच शिकवायचे त्याला. गणित सोडून! बालपणी कच्चं राहिलेलं माझं गणित पुढेही कधीही सुधारलं नाही. गणित विषयाचा माझ्या मनातला बागुलबोवाही कधीही गेला नाही. अजूनही कधी-कधी, 'उद्या गणिताचा पेपर आहे' असं स्वप्न पडतं आणि खडबडून जागं व्हायला होतं. हे स्वप्न रात्रीच नव्हे तर दुपारी जेवल्यावर डुलकी लागते, तेव्हाही पडतं कधी-कधी. वाटतं, दादांचं ऑफीस तेव्हा पुण्याला गेलं नसतं, तर कदाचित माझ्या मनावर बागुलबोवाने असं वर्षानुवर्षं अधिराज्य गाजवलं नसतं. कदाचित.

मो.८७७९१९४०४२

# 'काशी- एक पुण्य नगरी, मराठ्यांचे कर्तृत्व व आजचा मराठी समाज'

-सतीशचंद्र कोठारे

भाग - १

## 'काशी एक पुण्य नगरी'

नमस्कार,

मी सतीशचंद्र कोठारे, रहाणार ठाणे.

नुकताच काशीला जाण्याचा योग आला. परत येताना व आल्यावर बऱ्याच विचारांचा कल्लोळ मनात दाटला होता. विचार शब्दबद्ध करावे असे मनात सारखे येत होते, म्हणून हा प्रपंच.

मला काशीनगरीबद्दल लहानपणापासून एक गूढ आकर्षण होते. तसे ते बऱ्याच जणांना असणारच. इतिहासाच्या पुस्तकात व विविध धार्मिक पुस्तकात वाचले होते, शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला काशीहून गागा भट्ट आले होते. (हो इथे काशीत, भट्ट असेच म्हणतात, भट नव्हे, आणि हो, त्यांची गढीपण पाहिली आम्ही. भट्टांचे वारसदार बाहेरगावी गेले कारणे, त्यांना भेटणे न झाले). ज्ञानदेव महाराजांचे वडील काशीला जाऊन संन्यस्थ जीवन जगत होते तसेच प्रत्येक संत, काशीत बराच काळ व्यतीत करून परत आपापल्या कर्मभूमीत यायचे.

असो, तर अशा पुण्यनगरीत माझे मित्र श्री. संतोष पाचलग व त्यांच्या सुविद्य पत्नी वैष्णवी ह्यांच्या पुढाकाराने सहकुटुंब जाण्याचा योग आला.

काशी नगरीबद्दल थोडक्यात...

थोडे बुटके व रंगाने सावळे, अशा लोकांनी गंगा नदी किनारी, काशीला सुरवातीचे वास्तव्य केले व कपडे आणि चांदीचा व्यापार सुरू केला व नगर वसविले. कालांतराने, पश्चिमेकडून आलेल्या गोऱ्या व उंच लोकांनी या लोकांना तिथून हुसकावून, काशीत आपले बस्तान थाटले. ते स्वतःला आर्य (श्रेष्ठ वा महान) म्हणवत.

माझ्या लहानपणीच्या वाचनात, काशीचा पहिला संदर्भ आठवतो तो म्हणजे काशी नरेशाच्या तीन कन्या, अंबा, अंबिका व अंबालिका यांचे पितामह भीष्मांनी केलेले अपहरण!

पुराणातील संदर्भ द्यायचा तर भगवान शिवाने काशी (दिव्यांची नगरी) नगरीची स्थापना केली.

काशी नगरीची दुसरी नावे म्हणजे वाराणसी व बनारस. वरुणा नदी व अस्सी नदी जिथे गंगेला मिळतात त्या दोन संगमामधील भाग म्हणून 'वरूणा-अस्सी- वाराणसी'.

तर बहुदा, 'वाराणसी'ला पाली भाषेत बनारसी असे म्हणतात म्हणून बनारस हे नाव रूढ झाले असावे.

तर अशी ही शिवाची भूमी, देवळांची भूमी, शाश्वत अंतिम सत्याकडे नेणारी भूमी व गंगा स्पर्शाने पावन झालेली, लाखो हिंदूंचे श्रद्धास्थान 'काशी'!

काशीत पाय ठेवताच, एक विलक्षण वेगळी भावना व वातावरणात फरक मला तरी जाणवला.

पुढील भागांत पाहुया मराठ्याचे काशीतील कर्तृत्व.

*

काही नवे - काही जुने

# अनु काय लाजलीय म्हणता!

-नंदकुमार विजयकर

‘हा ‘सी’ कंपार्टमेंट आहे ना?’

‘हो,’

‘काय नंबर आहेत?’

‘हे, वरचे दोन बर्थ.’

‘कोठे? दिल्ली?’

‘हो. म्हणजे, सिमल्याला चाललोय.’

‘अरे वा! आम्हीपण तिकडेच.’

‘कुठलं हॉटेल?’

मग नावं, गाव. आम्ही कोण, तुम्ही कोठले. प्रवासात अशी संभाषणं होतातच. त्यात नवीन ते काही नाही. पण मी मात्र प्रवासात सहसा कुणाशी बोलत नाही. म्हणजे मी अबोल स्वभावाचा आहे असं काही नाही. अपरिचिताशी स्वत:हून ओळख काढून संभाषण वाढवणं मला जमत नाही, आवडतही नाही. मी जर एकटाच प्रवास करत असलो तर पुस्तकात डोकं खुपसतो नाहीतर झोपून जातो. मग माझ्याशीही कोणी बोलत नाही. पण काही लोक थोड्याशा ओळखीवर एवढं भरमसाट बोलतात, स्वत:ची माहिती सांगतात, दुसऱ्यांची जाणून घेतात. मी या सर्वांच्या विरुद्ध आहे. शिवाय अलीकडे फसवाफसवी, लूटमारीचे प्रकार वाढत चालले आहेत. लांबच्या प्रवासाचं सोडा. अगदी मुंबई-पुणे प्रवासातदेखील गुंगीची बिस्किटं देऊन लुबाडलं गेल्याचं आपण पाहतो. तेव्हा सहप्रवाशाशी जरुरीपेक्षा जास्त न बोलणं हा माझा नियम आणि तो मी कसोशीने पाळतो.

अलीकडेच मी एशियाडने पुण्याहून मुंबईला चाललो होतो. संध्याकाळी पाचची बस होती. तिकीट काढून बसमध्ये चढलो. खिडकीत एक वयस्क गृहस्थ बसले होतो. वय सत्तरीच्या पुढेच असावं. मी त्यांच्या बाजूच्या सीटवर बसू लागलो तसे ते मला म्हणाले,

‘तुम्हांला विंडो सीट हवी असेल तर बसा इकडे.’

‘छे हो, ती तुमची सीट आहे, तुम्ही बसा.’

‘अहो त्यात काय, नाहीतरी वाऱ्यामुळे मला सर्दीचा त्रास होतो.’ असं म्हणून ते उठलेच.

‘थँक यू.’ मी खिडकीत बसलो. माझा घसा खवखवत होता. म्हणून मी ‘खो गो च्या दोन गोळ्या डबीतून काढल्या.

‘काय तपकीर आहे वाटतं? माझी डबी वर बॅगेत राहिली.’ असं म्हणून त्यांनी माझ्या समोर तळहात पसरला.

‘तपकीर नाही, खोकल्याच्या गोळ्या.’

‘असं का? चालेल मला.’

मी मुकाट्यानं दोन गोळ्या त्यांच्या हातावर टेकवल्या. बस वेळेवर सुरू झाली. थोडसं स्थिरस्थावर झाल्यावर ते गृहस्थ माझ्याकडे वळून, ‘जरा उकडतंय नाही? पण घाबरु नका. घाटात हवा छान असते. खरं म्हणजे आज मी खूप आनंदात आहे. सकाळीच माझ्या सूनेचा फोन आला होता. माझा मुलगा हिंदू कॉलनीत राहतो. तो. सी.ए. आहे. माझी सून सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. तिला यू.एस्.ला जॉब मिळाला. उद्याच्या रात्रीच्या फ्लाईटने निघणार आहे. मी म्हटलं चला, तिला भेटून तर यावं. तसं फोनवरून तिचं अभिनंदन केलं. ती म्हणाली मला, बाबा, सगळं अचानक घडलं. इकडच्या आमच्या ऑफिसनेच सर्व व्यवस्था केली. तुम्ही इकडे येण्याची दगदग करू नका, आईकडे कोणीतरी पाहिजेच? आमच्या हिला गेल्या वर्षीच अटॅक आला. तिला एकटं ठेवून मी सहसा कुठे जात नाही. पण म्हटलं, आमची सून आता तीन चार वर्षे दिसणार नाही तर आपलं भेटून यावं.’

गाडीला अचानक ब्रेक लागला आणि बोलण्यालाही थोडी खीळ बसली. मी एक सुटकेचा सुस्कारा सोडला. बाप रे! काय नमुना आहे. नॉन स्टॉप बोल-बोल दांड्या चालूच होता. बरं माझ्या ‘हो-नाही’ची काही अपेक्षाच नव्हती. एव्हाना गाडी एक्स्प्रेस हायवेला लागली आणि त्या सद्गृहस्थाने परत माझा ताबा घेतला.

‘आपण काय करता?’ त्यांनी मला विचारलं. मी काही बोलायच्या आतच त्यांनी आपलं घोडं दौडवायला सुरुवात केली. ‘मी रेव्हेन्यू खात्यात होतो. तसा मी मूळचा मुंबईचाच; पण नोकरीनिमित्त एवढ्या बदल्या झाल्या, शेवटी पुण्याला स्थायिक झालो.’ आपण पुण्याला कोठे राहता, या त्यांच्या प्रश्नाला माझ्या उत्तराची अपेक्षा नव्हती हे आता मी जाणलं होतं. ‘आम्ही कँपात राहतो. तुम्हाला एक गंमत सांगतो. पूर्वी आम्ही मुंबईला राहत होतो तिथे अनु यायची. अनु माझी बालमैत्रीण. ती मला नाना म्हणते. इनफॅक्ट अनु अमेरिकेहून मुंबईला आलीय. तिचीपण भेट घ्यायची आहे.’ ही अनु कोण म्हणून मी विचार करत होतो. ‘अहो, अनु म्हणजे माधुरीची सासू.’ आता माधुरी कोण? आणखी मोठ्ठं प्रश्नचिन्ह. ‘अहो माधुरी दीक्षित, तिची सासू अनु नेने.’ मी मनात म्हटलं हे प्रकरण भलतंच भरकटत चाललंय. पण मुकाट्याने ऐकण्याशिवाय काही गत्यंतर नव्हतं. ‘तर गंमत अशी की, मी एकदा अनुला म्हणालो, ‘काही म्हण अनु, नाही, ही माधुरी तुझी सून असेल, भले टॉपची हिरॉईन असेल, पण दिसण्याच्या बाबतीत म्हणशील तर तुझ्या नखाचीदेखील सर येणार नाही! यावर अनु काय लाजलीय म्हणता! आता मात्र कहरच झाला. या गृहस्थाच्या फेकाफेकीला काही सुमारच राहिला नव्हता. त्याचं बोलणं बेलगाम चालूच होतं. तुम्हाला खोटं वाटत असेल तर थांबा, असं म्हणून त्यांनी खिशातून एक व्हिजिटिंग कार्ड काढून माझ्या हाती ठेवलं. मी ते पाहू लागलो. ते अनु नेनेचं होतं. तिची कसलीतरी एजन्सी आहे. त्यात तिचा फोटो होता. खरोखरच अप्रतिम सौंदर्य! फोटोत जरी तिची नखं दिसत नसली तरी पुरेपूर खात्री पटली, तिच्या नखाचीदेखील सर माधुरीला येणार नाही.

माझ्या शेजारी एक अजब रसायन बसलं होतं. अखंड बडबड चालू. दुसऱ्याच्या प्रतिसादाची अपेक्षा नाही. पुसटशी जरी शंका आली तरी भक्कम पुरावा देऊन तिथल्या तिथे शंकेचे निरसन. माणूस बोलघेवडा तसाच मनकवडा. बसनं चेंबूर सोडलं आणि यांची आवराआवर सुरू झाली.

‘काय हो, दादर यायला वेळ आहे. एवढी घाई काय?’

‘नाही, विचार करतोय सायनला उतरावं का? तिथं माझी मुलगी राहते. त्याचं काय आहे, आमच्या सूनेनं फोनवरनं पुन्हा पुन्हा बजावलं होतं, मुंबईला यायची तसदी घेऊ नका म्हणून आणि आता नऊ वाजायला आले आहेत. एवढ्या उशीरा गेलेलं कदाचित तिला आवडणार नाही. उद्या सकाळी भेटेन तिला. चला. अच्छा! आणि थँक्स!’

‘थँक्स? कशाबद्दल?’

‘अहो, तुमच्याबरोबर बोलण्यात वेळ बरा गेला.’

ते सायनला उतरले आणि मी सुटकेचा नि:श्वास टाकला.

दुसऱ्या दिवशी मला परत पुण्याला यायचं होतं. मी दादर टी.टी.ला आलो. बसमध्ये बसलो आणि शेजारी लक्ष गेलं. कालचेच गृहस्थ बसलेले. बाप रे! म्हणजे आज पुन्हा अनु लाजणार. पण हसत हसत मी त्यांना म्हटलं, ‘वा! आज परत आपली भेट झाली.’

ते जरा माफकच हसले. यावेळी मला विंडो सीट मिळाली होती. मी एक शिष्टाचार म्हणून त्यांना सहज म्हटलं, ‘‘काय बसणार का खिडकीत?’

आणि तेही पटकन उठून तयार झाले. मी म्हटलं, ‘ठीक आहे.’

मी माझी खोगो डबी काढली आणि थोड्याश्या चेष्टेच्या सुरात त्यांना म्हणालो, ‘काय, तपकीर ओढणार का?’

‘छे हो, काल उगाच गंमत केली. मी तपकीर ओढत नाही.’

‘बरं, खो गो तर घ्या.’

‘नाही, नको.’

आज या माणसाचं काहीतरी बिघडलेलं दिसत होतं. स्वारी मूडमध्ये नव्हती. गंमत म्हणजे, हा बडबड्या माणूस आज गप्प गप्प होता आणि कधी नव्हे ते मला मात्र त्यांच्याशी बोलावसं वाटत होतं.

‘मग काय, सूनबाईंना निरोप दिला?’

‘नाही. भेटच नाही झाली.’ असं म्हणून ते खिडकीबाहेर पाहू लागले. मी ओळखलं, त्यांची अधिक काही बोलायची इच्छा नव्हती. मग मीदेखील गप्प बसलो. पण माझ्या डोक्यात कीडा वळवळू लागला. भेट झाली नाही म्हणजे काय? हा गृहस्थ भेटायला गेला नाही की त्यांची सून त्यांना भेटली नाही? कदाचित आदल्या रात्रीचं फ्लाईट असेल, त्यांना चुकीचा निरोप मिळाला असेल किंवा त्यांनी चुकीचं ऐकलं असेल. हे गृहस्थदेखील मुलाकडे जाण्याऐवजी मुलीकडे वस्तीला राहिले. सूनेला घाबरत होते की काय? तसं त्यांच्या सूनेनं बजावलं होतं, मुंबईला येण्याची तसदी घेऊ नका म्हणून. छे! मी उगाच डोक्याचा भुगा पाडून घेत होतो आणि हे महाशय मात्र चक्क घोरत पडले होते.

बसने लोणावळा सोडलं. थोड्या वेळाने ते माझ्याकडे वळून म्हणाले, ‘काल मन थाऱ्यावर नव्हतं. खरं सांगू का, मी माझ्या मित्राकडे राहिलो होतो. माझी मुलगी मिरा रोडला राहते.’

हा माणूस मला धक्क्यावर धक्के देत होता. काल म्हणाला ते खरं की आज म्हणतोय ते खरं? की याच्या डोक्यात काही बिघाड आहे?

‘तुम्हाला शंका आली असेल हा माणूस असा काय बोलतो? पण तुम्हांला सांगतो, बरोबर आजच्या दिवशी माझ्या पत्नीला अटॅक आला. मी घरी नव्हतो. घरी आल्यावर धावधाव केली. पण मॅसिव हार्ट अटॅक, काही उपयोग झाला नाही. एक वर्ष झालं या गोष्टीला. मुलगा आणि सून इकडे फिरकलेच नाहीत. मुलगी तिच्या संसारात गुंतलेली. मी इकडे पुण्याला एकटा - बोलणार कुणाशी? भिंतीशी? घर खायला उठतं. मग असाच उठतो. कधी नाशिक, कधी सोलापूर, कधी मुंबई. तुमच्यासारख्यांची सोबत मिळाली तर तेवढाच विरंगुळा.’

मी म्हटलं, ‘बरोबर आहे तुमचं म्हणणं.’

एवढा पुणे-मुंबई परतीचा प्रवास आम्ही सोबतीनं केला; पण त्यांनी

(पान ५ कॉलम ४ वर)

# माझे संपादक

-कल्पना सुभाष कोठारे

मी साहित्य लेखनाच्या सागरात उडी घेतली तेव्हा मदतीचा हात पुढे करणारे माझे पहिले संपादक होते ‘वाङ्मयशोभे’चे म.म.केळकर आणि अनुराधा’ मासिकाच्या गिरीजा कीर! ‘मी लिहू शकते’ हा आत्मविश्वास या दोघांमुळे मला मिळाला. साध्या पत्रलेखकासही अंक आणि मानधन दिलेच पाहिजे- हा आग्रह गिरीजा कीर लावून धरीत; तर वाङ्मयशोभेच्या अंकासोबत माझ्या साहित्याचे पाठकोरे कागदही मला मिळत. वाङ्मयशोभेने माझ्या ‘लघुत्तम कथा’ या साहित्य प्रकाराचे कौतुक केले. हल्ली याचेच ‘अलक’ म्हणजे अति लघुत्तम कथा हे रूप लोकप्रिय झालेले आढळते.

ही झाली ज्ञातीबाहेरच्या मासिकांबद्दलची कथा. मात्र इथे मला आठवतेय की अनेक वर्षांपूर्वी एकदा एक बारीकसा, गोरटेला मुलगा आमच्या सांताक्रूझच्या घराचे दोन जिने चढून आला. स्वत:ची ओळख करून देत तो म्हणाला, ‘मी तुमचा लेख मागायला आलो आहे.’ मी चाटच पडले कारण तो मुलगा म्हणजे ‘प्रभुतरुण’ मासिकाचा उपसंपादक डॉ. निखील धुरंधर होता. सुहास कोठारे प्रमुख संपादक; तर हा उपसंपादक सुहास तर सातत्याने बारा महिने बारा लेख मिळवून एखादे ‘सदर’ चालविण्याचे अत्यंत कठीण काम सजगपणे पार पाडत होते. सुहास यांच्या प्रोत्साहनामुळे मी नव्याने सदर लेखन या साहित्य प्रकारात प्रगती करू शकले. कोणताही विषय न सुचविता, कोणतीही ढवळाढवळ न करता या थोर संपादकाने दरमहा माझे सदर लेखन छापले. त्यावेळी त्यांनी जर संपादकीय कातर लावून काटछाट केली असती तर कदाचित माझा उत्साह मावळला असता. ‘चला येता?’ हे माझ्या सदराचे शीर्षकही त्यांनी सहजगत्या स्वीकारले होते. निखील घरी येऊन माझे हस्तलिखित नेत होता हा आणखी एक प्लस पॉईंट! डॉ. निखीलने परदेशी प्रयाण केल्यावर मात्र मी पोस्टाची वाट धरली.

प्रभुतरुणाच्या कार्यकारी मंडळावर मी कधीही नव्हते. फोन, पत्रे... या साधनमार्गेही माझा संपादकांशी संबंध नव्हता. मात्र तरीही एक नक्की होते. आम्हाला एकमेकांविषयी स्नेहयुक्त आदर होता. पुढे प्रभुतरुणाच्या पंच्याहत्तरी निमित्ताने ‘निवडक प्रभुतरुण’ हे पुस्तक काढले गेले. अचानकच ते माझ्या हाती पडले. तर काय? त्यात माझी ‘कथा केजीच्या ॲडमिशनची’ ही कविता समाविष्ट झालेली. ‘मला हे कुणीच कसे कळवले नाही’ - असा विचारही क्षणभर मनात येऊन गेला. माझा मुलगा लहान असताना मी लिहिलेली ही कविता आजही ताजी वाटली म्हणूनच निवडली असावी. कारण अजूनही डोनेशनची दुष्ट प्रथा चालूच आहे. मी माझ्या मनातले हे विचार तेव्हा कुणाजवळतरी मांडलेही. पण हाय रे दैवा! माझ्या या सरळपणे म्हटले गेलेल्या वाक्याचा कानगोष्टीच्या खेळाप्रमाणे विपर्यास होऊन सुहास कोठारेंच्या कानी घातला गेला. विपर्यास काय; तर म्हणे ‘डोनेशन देणाऱ्यांचे लिखाण प्रभुतरुण छापतो.’ माझ्या तोंडी हे वाक्य घातले गेले. साहजिकच एका लग्नप्रसंगी मला सुहास कोठारे भेटले तेव्हा त्यांनी स्पष्टीकरण करीत म्हटले की ‘असे आम्ही करत नाही.’ हे त्यांचे समर्थन माझी पाटी कोरी असल्याने मला संदर्भहीनच वाटले तेव्हा. माझी ट्यूब उशीराच पेटली या बाबतीत. पण दुर्दैव असे की माझ्यावर घेतलेला खोटा आळ दूर करण्यास मला वेळच मिळाला नाही. गैरसमजाची शाल पांघरूनच ते देवाघरी गेले. माझ्याविरूद्ध हा कानगोष्टीचा खेळ करणाऱ्या त्या व्यक्तीला काय समाधान मिळाले; कोण जाणे! सुहास यांच्या जाण्याने आम्हा साऱ्यांचा एक सच्चा स्नेही हरवला होता आणि हे दु:ख जास्त जिव्हारी लागणारे होते.

नंतर मी बदलीनिमित्त नागपूरला होते अडीच वर्षे. या काळात माझा प्रभुतरुणशी संपर्क तुटला. मात्र निखीलची आई - अनुराधा माझी छान मैत्रीण झाल्याने आमचे पत्र लेखन चालूच होते.

सुहास कोठारेंनंतर विहंग नायक यांनी ‘प्रभुतरुणांची संपादकीय धुरा उत्तम रीतीने सांभाळली. त्यांच्याशी फोनवर वा पत्राद्वारे संवाद नव्हता माझा. पण लेखक म्हणून आमचे नाते अतिशय सौहार्दपूर्णच राहिले. त्याचा प्रत्यय एका प्रसंगाने मला आला. प्रभुरुणाच्या एका वाढदिवसाला मला उपस्थित रहाणे शक्य नव्हते. नेमकी त्या दिवशी आमची लोणावळ्याला वर्षासहल होती आणि वसंत बापटांचे काव्यवाचन हे त्या सहलीचे खास आकर्षण होते. ती सहल मी कशी टाळणार? मी फोनवरून विहंग यांना परिस्थिती सांगितली आणि माझी कविता त्यांनी वाचून दाखवावी अशी विनंती केली. माझ्या फोनवरील विनंतीस विहंग यांनी मान दिला. प्रभुतरुणाच्या वाढदिवशी त्यांनी माझी कविता वाचून दाखविली. विशेष म्हणजे ‘असा हा आमुचा प्रभुतरुण’ हे त्या कवितेचे धृपद त्यांनी सर्व श्रोत्यांना म्हणावयास लावून सभागृह दणाणून सोडले. विहंग संदर्भात आणखी एक छोटीशी आठवण. त्यांचा एक धनादेश पोस्टाजवळ खाली पडला अन् मला तो अपघातानेच हाती लागला. माझ्यामुळे तो त्यांना परत मिळाला तेव्हा त्या थोर माणसाने फोनवर माझे चक्क आभार मानले.

(क्रमश:)

## ज्येष्ठ रंगकर्मी अंबर कोठारे यांचे वृद्धापकाळाने निधन

अंबर कोठारे यांचा जन्म १४ एप्रिल १९२६ रोजी मुंबईत झाला. त्यांचे बालपण अत्यंत कष्टात गेले. घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे कोठारे यांना वेगवेगळी कामे करावी लागली. दिवाळीच्या काळात गिरगावात रस्त्यावर उटणे विकण्याचेही काम त्यांनी काही काळ केले होते. कालांतराने शिक्षण पूर्ण करून ‘ब्रिटिश बँकऑफ दि मिडल ईस्ट’ या बँकेत त्यांनी नोकरी केली. तब्बल चार दशके त्यांनी या बँकेत वेगवेगळ्या पदांवर काम केले. या बँकेचे भारतातर्फे प्रतिनिधीत्व करण्याचीही संधी त्यांना मिळाली होती. अंबर कोठारे म्हणजे बहुरंगी व्यक्तिमत्त्व. नोकरी सांभाळत त्यांनी आपली रंगभूमीची आवडदेखील जोपासली. प्रायोगिक रंगभूमीवर त्यांनी दीर्घकाळ काम केले. ‘इंडियन नॅशनल थिएटर’ (आयएनटी) या संस्थेच्या मराठी विभागाचे ते पहिले सचिव होते. या संस्थेतर्फे त्यांनी बरीच नाटके रंगभूमीवर सादर केली. ‘झोपी गेलेला जागा झाला’ या नाटकाचे त्यांनी शेकडो प्रयोग सादर केले होते. काही नाटकांमध्ये त्यांनी अभिनयदेखील केला होता. ‘झुंजारराव’ नाटकामधील त्यांची भूमिका प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली होती. अंबर कोठारे यांनी उत्तम नाटकांची निर्मितीही केली होती. त्यापैकी एक प्रमुख नाटक म्हणजे ‘जेथे जातो तेथे’. या नाटकाच्या लेखनासाठी कोठारे यांनी प्रख्यात लेखक दत्ता भट यांना नाशिकवरून मुंबईत निमंत्रित केले होते. या नाटकामध्ये दत्ता भट यांच्यासोबतच अंबर कोठारे यांनीदेखील अभिनय केला होता.

प्रसिद्ध अभिनेते-निर्माते-दिग्दर्शक महेश कोठारे यांच्या बालकलाकार तसेच कालांतराने निर्माता-दिग्दर्शक म्हणून झालेल्या जडणघडणीत अंबर कोठारे यांचे मोलाचे योगदान होते. महेश कोठारे यांची निर्मिती-दिग्दर्शन क्षेत्रामधील पदार्पण असलेला ‘धुमधडाका’ हा चित्रपट सर्वतोपरी चांगला होण्यासाठी अंबर कोठारे यांनी भरपूर कष्ट घेतले होते. त्यानंतर महेश कोठारे यांच्या प्रत्येक चित्रपटामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. ‘देदणादण’ या चित्रपटामध्ये अंबर कोठारे यांनी खलनायकाची व्यक्तिरेखा अत्यंत ताकदीने साकारली होती. त्यानंतर महेश कोठारे यांनी दिग्दर्शित केलेल्या काही महत्त्वाच्या कलाकृतींमध्येही-देखील त्यांनी वेगवेगळ्या भूमिका साकारल्या होत्या. प्रभुतरुणातर्फे त्यांना आदरांजली.

✳

## पाठारे प्रभु चॅरिटीज

दिनांक १५ जानेवारी रोजी चॅरिटीजचा विद्यार्थी गौरव समारंभ नेहमीप्रमाणे भव्यदिव्य असा साजरा झाला. दोन वर्षे करोनाकाळ असल्याने प्रत्यक्षात साजऱ्या झालेल्या या सोहळ्याचे ज्ञातीयांनी स्वागतच केले. यावर्षी एकूण शेचाळीस विद्यार्थ्यांना गौरविले गेले. विद्यार्थिनींपेक्षा यशस्वी विद्यार्थी अधिक होते. यावर्षी वाजतगाजत विद्यार्थी मिरवणूक, अध्यक्षीय भाषण (श्री. उदय मसकर यांचे) सूत्रसंचालन, आभार प्रदर्शन इ. सर्वच नेटके होते. यावर्षी या समारंभाच्या अध्यक्षा होत्या. डॉ. सौ. आश्विनी वाघ आणि त्यांचे पती डॉ. श्री. मिलिंद वाघ. डॉ. आश्विनी यांचे वडील श्री. शिवनाथ देसाई हे चॅरिटीजचे पूर्णाध्यक्ष. त्यांची उणीव हे विद्यमान अध्यक्षांना आणि डॉ. आश्विनी यांना असणे अगदी अटळच. पाहुण्यांचे स्वागतगीत आणि विद्यार्थी गौरवगीत आपल्या सहज शैलीने नलिनी तळपदे यांनी रचले होते. गायकांनी ते सादरही छान केले. बक्षिस समारंभानंतर नेहमीप्रमाणे गान महोत्सव साजरा झाला. गायकांमध्ये सौ. रोनिका विजयकर होत्या आणि सूत्रसंचालन होते अनघा मोडक यांचे. विश्वस्तांच्या सहभागामुळेच या भव्य सोहळ्याची इमारत फळा आली.

✳

(पान ४ कॉलम ४ वरून)

माझं नाव विचारलं नाही की मी त्यांचं नाव विचारलं नाही. आता जेथे जन्माचा सोबती साथ सोडून गेला, तेथे दोन-तीन तासांच्या सोबतीला कसलं आलंय नाव आणि गाव? मग उगाच मित्र गोळा करायचे, माणसं जमवायची. शेवटी या सगळ्या जमवाजमवीत आपण मात्र एकटेच राहतो.

शिवाजी नगर जवळ आलं तसा मी बॅग घ्यायला उठलो. न राहवून मी त्यांना विचारलं, ‘मग अनुची भेट झाली?’

अनुचं नाव घेताच ते गृहस्थ काय लाजले म्हणून सांगू! मला काहीच कळेना. खरं-खोटं, वास्तव, स्वप्न, भास-आभास यांची अशी काय सरमिसळ झाली होती की, डोकं चक्रावून गेलं. वाकडेवाडी आली. मी त्यांच्याकडे निरोपासाठी पाहिलं तर ते शून्यात कोठेतरी पाहत होते. मी उतरलो. खिशातून खोगोची डबी काढली. गोळ्या संपल्या होत्या. रिकामी डबी रस्त्याच्या कडेला फेकली आणि रिक्शा पकडायला धावलो.

(‘सल शिरा’ कथासंग्रहातून साभार)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| १९-०१-२३ | सौ.रिआ व श्री. निहार योगेन्द्र विजयकर | कन्या, | खार |
| २२-०१-२३ | सौ मिताली आणि श्री महेश गौतम नायक | पुत्र आणि कन्या (जुळे) | |

### आत्याबाई नाव बोला

कृषिका निहार विजयकर

### कुर्यात् बटोर्मंगलम्

२६-०१-२३ चि. आरुष आनंद आगासकर

### नांदा सौख्यभरे

२२-०१-२३ श्री हर्ष संदेश प्रबोध देसाई कु. दिवांशी लवुराज भार (आं. ज्ञा.)

### विवाह रजत महोत्सव

०३-१२-२२ सौ. ऐश्वर्या आणि श्री. आशिष प्रमोद नवलकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १४-०१-२३ | श्रीम. आशा विश्वास जयकर, | वय ९२, | खार |
| १७-०१-२३ | श्रीम. मृणाल राधाकिशन तळपदे, | वय ७७, | बोरीवली |
| २०-०१-२३ | श्री. शशीकांत रामचंद्र जयकर | | खार |
| २१-०१-२३ | श्री. अंबर महादेव कोठारे, | वय ९६, | बोरीवली |
| २१-०१-२३ | श्री. नंदकुमार रामराव तळपदे | वय ८७, | पुणे |
| २६-०१-२३ | श्रीम. शीला मधुकर कोठारे, | वय ८५, | लंडन |

***चुकीची दुरुस्ती*** - गेल्या अंकात श्री. प्रदीप मधुकर मानकर ऐवजी श्री. प्रवीण मधुकर मानकर आणि कु. प्रीत मधुकर विजयकर असे वाचावे.

## प्रभुतरुणास देणगी

∗ नूतन विजय देसाई आणि रजुला विजय देसाई यांजकडून प्रभुतरुणाच्या शताब्दी वर्ष प्रारंभानिमित्त रु. १०,०००/-

∗ सौ. नीलन आणि दीपक माधव धैर्यवान यांजकडून दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी साजऱ्या झालेल्या त्यांच्या विवाहाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त रु. २००१/-

∗ सौ. ऐश्वर्या आशीष नवलकर आणि श्री. आशीष प्रमोद नवलकर यांजकडून त्यांच्या विवाहाच्या रजत महोत्सवानिमित्त (३-१२-९७ ही विवाहाची तारीख) रु. १०००/-

∗ चि. अमोल किरण व्यवहारकरच्या उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ शर्मिला आणि आरतीकडून रु. १०००/-

देणगीदारांचे मन:पूर्वक आभार

✳

## अभिनंदन

∗ डोंबिवली येथे २१ जानेवारी रोजी झालेल्या 'पुस्तक आदानप्रदान' कार्यक्रमात महेश कोठारे यांच्या 'डॅम इट आणि बरंच काही' या आत्मचरित्राचे प्रकाशन झाले. यावेळी 'तारांगण' मासिकाचे संपादक श्री. मंदार जोशी यांनी त्यांची ज्येष्ठ निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता म्हणून मुलाखत घेतली.

∗ श्री. सुमीत नवलकर यांचे इंस्टाग्रामवर Entanglement हे पुस्तक आहे.

∗ स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांना



त्यांच्या ९०व्या वाढदिवशी श्री. सुनील जयकर यांनी स्वत: बनविलेले शुभेच्छापत्र भेट दिले. ते आशाताईंना आशामावशी म्हणतात. हा ऋणानुबंध.

∗ २०२२ साली दहावीला संस्कृत विषयात प्रथम आल्याबद्दल श्री. अर्णव धराधर याचा त्याच्या पार्ले टिळक विद्यालय शाळेत सत्कार करण्यात आला.

∗ दिनांक १५ डिसेंबर २२ रोजी विलेपार्ले येथील श्री. म. जोशी दिलासा केंद्र आयोजित कार्यक्रमात सौ. बागेश्री परीख यांचे कवचकुंडले कापली या विषयावर व्याख्यान झाले. स्वातंत्र्यवीर सावरकर केंद्रातर्फे समाजसेवी व्यक्तीला कै. रामभाऊ बर्वे यांच्या नावाने पुरस्कार दिला जातो. यावर्षी हा पुरस्कार २६-१-२३ रोजी बागेश्री परीख यांना देण्यात आला. दहा हजार रूपये रोख आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

∗ नुकत्याच झालेल्या 'हाफ मॅरेथॉन' मध्ये श्री. निषाद बन्सीधर धुरंधर यांचा सहभाग होता.

✳

## पाठारे प्रभू को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी

खार उपनगरात असणाऱ्या पाठारे प्रभु को. ऑप. हौसिंग सोसायटीला सात जानेवारी २०२३ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त सोसायटीने दिमाखात शतकोत्तर सोहळा साजरा केला. सोसायटीचे सर्व रस्ते दीपोत्सवाने उजळून निघाले होते. बालगंधर्व नाट्यगृहात सुमधूर गाण्याचा कार्यक्रम झाला. यावेळी सोसायटीला मदतीचा हात देणारे मान्यवर श्री. आशीष शेलार, अलका केरकर, गजानन कीर्तिकर, सुरेश प्रभू. यांचा सोसायटीचे अध्यक्ष नंदकुमार विजयकर आणि चेअरमन अशोक तळपदेंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे सोशल समाज, महिला समाज, सोशल क्लब, चॅरिटीज, प्रभु प्रभात आणि प्रभु तरुण यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. मान्यवरांना एका बाजूला आसन्या ही रांगोळी आणि दुसऱ्या बाजूला सोसायटीच्या इमारतीचे चित्र असलेले दहा ग्रॅम चांदीचे नाणे देण्यात आले. सोसायटीतील प्रत्येक कुटुंबप्रमुखाला-ही हे नाणे स्मृतिचिन्ह म्हणून दिले गेले. दुसऱ्या दिवशी आठ तारखेला फटाक्यांचा कोट लावला गेला आणि खास घड्याचा बेत होता. नऊ तारखेला सत्यनारायणाची पूजा होती. यावेळी प्रत्येक कुटुंब प्रमुखाला सोसायटीचे पाच शेअर्स देण्यात आले. चोवीस जानेवारीला स्त्रियांचे हळदीकूंकू झाले. या शतकोत्तर महोत्सवी वर्षात सोसायटीने इगतपुरी येथे फॉगसीटीत (स्टुडियोत) सेकंड होम घेतले. सर्व सुविधांनी सुसज्ज अशा या घराचा लाभ यापुढे नाममात्र भाड्याने कुणाही पाठारे प्रभूला घेता येईल. या सेकंड होमला सोसायटीची सहल जाणार आहे. या सोहळ्याची दखल हिंदुस्तान टाईम्स, सामना आदी वृत्तपत्रांनी घेतली. प्रभुतरुणातर्फे सोसायटीच्या वाढदिवसासाठी शुभेच्छा. अशीच उत्तरोत्तर भरभराट होत राहो.

## परीक्षेतील सुयश

**एमसीए (मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन)**

श्री. अमोल किरण व्यवहारकर
८१.६९ टक्के
सीजीपीआय : ९.४२

अमोल DESNMITD दादर या महाविद्यालयात होते. ते तिसरे आले परीक्षेत.

**सीए (चार्टर्ड अकाऊंटंट)**

देवश्री नीलेश कोठारे

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67